**प्रेस नोट** **दि.१४/०३/२०१९**

## कोरेगाव पार्क पो.स्टे.पुणे

## महाविदयालयीन बेपत्ता युवकाचा पोलीसांनी घेतला शोध

एक मुलगा वय १९ वर्षे हा नेस वाडिया कॉलेज येथे बी.कॉम. चे पहिल्या वर्षात शिक्षण घेत आहे. तो कोरेगाव पार्क हॉटेल कॉनरॅडचे पाठीमागे लक्ष्मी विलास हॉस्टेलमध्ये मित्रासोबत राहावयास आहे. त्याचे आई वडील शिलाँग, मेघालय येथे राहतात व चुलता जुनी सांगवी, पुणे या ठिकाणी राहावयास आहेत.

दि.०७/०३/२०१९ रोजी दुपारी ०१.०० वा. मुलगा सारंग हा अचानक राहते हॉस्टेलमधून गायब झाला. कॉलेजमधील त्याचे मित्रांनी त्याचे आई वडील व चुलते यांना माहिती दिली. त्याचे चुलते हे सुधांशू गेवाली, रा.साईप्रसाद बिल्डिंग, लेन नं.३, मधुबन सोसायटी, जुनी सांगवी, पुणे यांनी कोरेगाव पार्क पोलीस स्टेशनला येवून सारंग गेवाली हा मिसींग झालेबाबतची तक्रार दिली. ती तात्काळ नोंद करून घेतली. मिसींग चौकशीमध्ये मुलगा सारंग गेवाली हा दोन मोबाईल वापरत असल्याचे सांगितले., परंतू सदरचे दोन्ही मोबाईल बंद होते. त्यामुळे नमूद मोबाईल  नंबर व आयएमईआय नंबर ट्रेसिंगला लावले. तसेच सदर मुलगा हा कृष्णाचा भक्त असल्याचे चौकशीत समजून आले. दरम्यान दि.०९/०३/२०१९ रोजी मुलगा सारंग त्याचे मैत्रिणीबरोबर व्हॉटसअॅपद्वारे बोलत असल्याचे समजले. त्यावरून तात्काळ मिसींग मुलाचे वडील सलील गेवाली, रा.शिलाँग, मेघालय यांचेशी स्वतः श्री.मदन बहाद्दरपुरे यांनी फोनवरून संपर्क करून माहिती दिली व दि.१२/०३/२०१९ रोजी सदरचा मुलगा याचे वृंदावन पश्चिम उत्तर प्रदेश येथील लोकेशन आले. त्यावरून त्याची आई श्रीमती गंगा यांनी तात्काळ सदर ठिकाणी जावून शोध घेतला असता मिसींग मुलगा सारंग हा वृंदावन मंदिरात भजन व कीर्तनात होता. सदर ठिकाणी त्याची आई पोहोचली व त्याचे आईस मिळून आला. त्याबाबत मुलाचे वडील सलील गेवाली यांनी फोनद्वारे मुलगा सुखरूप मिळून आल्याचे सांगून, पोलीसांचे आभार मानले.

सदर मुलाचा शोध श्री.मदन बहाद्दरपुरे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, कोरेगाव पार्क पोलीस ठाणे, पुणे व पोलीस कर्मचारी विनोद साळुंखे यांनी तांत्रिक विश्लेषणावरून शोध घेवून लावलेला आहे व मुलगा सुखरूप आई वडीलांचे ताब्यात मिळालेला आहे.

(मदन बहाद्दरपुरे)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
कोरेगाव पार्क पो.स्टे.पुणे